महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १२९ वा | दिनांक : १४/०२/२०२५ | वार : शुक्रवार

## ठाकरेंचे तीन खासदार शिंदेंच्या मंत्र्यांच्या घरी स्नेहभोजनाला हजर; चर्चांना उधाण



**मुंबई** : शरद पवार यांनी एकनाथ शिंदे यांचा सत्कार केल्यामुळे संजय राऊत कमालीचे नाराज झाले होते. यावरून राऊतांनी शरद पवारांवर टीका देखील केली होती. ठाकरे गटाकडूनही संजय राऊत यांची पाठराखण करण्यात आली होती. सकाळी संजय राऊत यांनी थयथयाट केला, तर त्यांच्याच पक्षाचे तीन खासदार एकनाथ शिंदे यांच्या पक्षाच्या खासदाराने आयोजित केलेल्या स्नेहभोजनाला हजेरी लावली होती. यावरून राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. तर आम्ही केवळ स्नेहभोजनला गेलो होतो, त्याशिवाय दुसरा कोणता विषय नाही, असे स्पष्टीकरण ठाकरे गटाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी दिले.

शिंदे गटाचे नेते आणि केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी नवी दिल्लीत येथे सर्व खासदारांसाठी स्नेहभोजनचा कार्यक्रम ठेवला होता. या स्नेहभोजनला ठाकरे गटाचे खासदार संजय जाधव, नागेश पाटील आष्टीकर आणि भाऊसाहेब वाकचौरे हे उपस्थित होते. दुसरीकडे, मंगळवारी झालेल्या एकनाथ शिंदे यांच्या सत्कार सोहळ्यातही ठाकरे गटाचे खासदार संजय दिना पाटील यांनी उपस्थिती दर्शवली होती. या सर्व घडोमोडी पाहता शिवसेना शिंदे गटाकडून सुरू असलेले ऑपरेश टायगर यशस्वी होत आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे.

दरम्यान, दिल्लीत अधिवेशनाच्या निमित्ताने आल्यावर महाराष्ट्रातील सर्व खासदार राजकीय भेदाभेद, पक्ष विसरुन एकत्र येतात. त्याच प्रकारे ठाकरे गट आणि शिंदे गट असे विभागले गेलेले, मात्र मुळात जुने सहकारी असलेले खासदार एकत्र आले असावेत, असा अंदाज वर्तवला जात आहे. मात्र, सकाळी संजय राऊतांनी टीका केली असताना रात्री ठाकरेंचे खासदार एकनाथ शिंदेंच्या मंत्र्यांच्या स्नेहभोजनाला गेल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत.

प्रतापराव जाधव यांनी महाराष्ट्रातील सर्व खासदारांना बोलावले होते. आम्ही केवळ स्नेहभोजनासाठी गेलो होतो. स्नेहभोजनला न जाण्याच्या पक्षाकडून कुठल्याही सूचना वगैरे नव्हत्या. प्रतापराव जाधव केंद्रीय मंत्री आहेत. त्यांनी स्नेहभोजनला बोलावल्यामुळे आम्ही गेलो होतो. यामध्ये दुसरा कोणता विषय नाही. मी केवळ पाच मिनिटांसाठी गेलो, त्याठिकाणी मी जेवण केले नाही. सहज भेट घेऊन आणि ज्यूस पिऊन आलो. ऑपरेशन टायगर असे काही नाहीये. या सगळ्या अफवा आहेत. कुणीही आमच्या एकाही खासदाराच्या संपर्कात नाही. महत्त्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून ऑपरेश टायगर सारख्या गोष्टींकडे लक्ष वेधने ठीक नाही, असे स्पष्टीकरण नागेश पाटील आष्टीकर यांनी दिले.

विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वी उद्योगमंत्री उदय सामंत यांनी ठाकरे गटाचे खासदार लवकरच फुटणार असल्याचा दावा केला होता. त्यानंतर ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी तातडीने दिल्लीत पत्रकार परिषद घेतली. त्यांच्या पत्रकार परिषदेस लोकसभेतील आठ खासदार उपस्थित होते. संजय दिना पाटील गैरहजर होते. यावेळी अरविंद सावंत यांनी टायगर अभी जिंदा है, आमची एकीची वज्रमूठ आहे असे सांगितले होते.

आता त्यांच्या या घोषणा कागदावरच राहिल्याचे सिद्ध झाले आहे. कारण याच ८ खासदारांतील ३ खासदार काल रात्री शिंदे गटाच्या खासदाराच्या स्नेहभोजनाला हजर होते. या राजकारणाची राज्याच्या राजकारणात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. आजच माजी आमदार राजन साळवी शिंदे गटात प्रवेश करणार आहेत. या धक्क्यातून सावरत असतानाच शिंदे गटाचे डिनर पॉलिटिक्स समोर आले आहे.

## हर्षवर्धन सपकाळ काँग्रेसचे नवे प्रदेशाध्यक्ष



**मुंबई** : विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आपला राजीनामा पक्ष श्रेष्ठींकडे सादर केला होता. आता त्यांचा राजीनामा मंजूर झाला असून त्यांच्या जागेवर काँग्रेसचे माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांची नियुक्ती झाली आहे. तसेच विजय वडेट्टीवारांची काँग्रेस विधानसभा विधी मंडळ पक्षनेते पदी नियुक्ती करण्यात आली आहेकाँग्रेस प्रदेशाध्यक्ष पदावर नियुक्ती करताना ज्या नेत्याच्या संस्था नाहीत, अशा व्यक्तीची आणि आक्रमक चेहऱ्याची निवड करावी, असा राहुल गांधी यांचा आग्रह होता. त्यामुळेच हर्षवर्धन सपकाळ यांचे नाव निश्चित झाले. हर्षवर्धन सपकाळ हे राहुल गांधी यांच्या अत्यंत जवळचे मानले जातात.

हर्षवर्धन सपकाळ यांनी या आधी बुलढाणा मतदार संघाचे प्रतिनिधित्त्व केलेले आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव म्हणून देखील त्यांनी काम केले आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी अनेक वर्ष राष्ट्रीय स्तरावर काम केले आहे. पक्षाचे उपाध्यक्ष असताना राहुल गांधी यांनी स्थापन केलेल्या कार्यगटाचेसुद्धा ते सदस्य होते. राजीव गांधी पंचायत राज संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले आहे. उत्तराखंड आणि पंजाबसह अनेक राज्यांच्या निवडणुकीत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. हर्षवर्धन सपकाळ हे काँग्रेस विधिमंडळ पातळी वरसुद्धा अभ्यासू आणि आक्रमक आमदार म्हणून परिचित आहेत.

एनएसयुआय, युवक काँग्रेसच्या माध्यमातून हर्षवर्धन सपकाळ विद्यार्थी, युवक चळवळीत सक्रीय होते. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मुकूल वासनिक यांच्या माध्यमातून ते काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या थेट संपर्कात आले. त्यानंतर वऱ्हाडासह संपूर्ण राज्यात युवक काँग्रेसची मजबूत बांधणीत सपकाळ यांची भुमिका महत्वपूर्ण राहिली. त्यामुळे राहुल गांधी ब्रिगेडमध्ये महाराष्ट्रातील खासदार राजीव सातव आणि हर्षवर्धन सपकाळ यांची वर्णी लागली होती. जिल्हा परिषदेचे सदस्य, अध्यक्ष, आमदार, अखिल भारतीय काँग्रेसचे सचिव ते पक्षाचे अखिल भारतीय पंचायत राज संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष पदापर्यंत त्यांनी काम केले आहे. त्यामुळे राहुल गांधी यांच्या 'गुड बुक' मध्ये सपकाळ असल्याचे मानले जाते.

बुलडाण्याचे माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांना बंटी दादा म्हणूनही ओळखले जाते. काँग्रेसचे नेते राहूल गांधी यांचे विश्वासू सहकारी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर २०१७ मध्ये गुजरात निवडणुकीची मोठी जबाबदारी काँग्रेसने सोपवली होती. काँग्रेसने त्या वेळी गुजरात निवडणुकीसाठी अशोक सिंह गहलोत यांच्या नेतृत्वाखाली एक टीम तयार केली होती. यामध्ये सहप्रभारी म्हणून हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १४ फेब्रुवारी २०२५


## महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेत श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाची सुप्रिया गायकवाड उत्तीर्ण



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या महाराष्ट्र शासन मंत्रालय महसूल विभागातील महसूल सहाय्यक या पदाच्या अंतिम परीक्षेत उत्तीर्ण होऊन निवड झाल्याबद्दल कु सुप्रिया गायकवाड हिचा सत्कार आणि अभिनंदन भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल शिवाजीराव मोरे यांचा हस्ते करण्यात आला.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर गायकवाड यांनी २०२४ मध्ये मुख्य परीक्षा दिली.

या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून तिची मंत्रालय महसूल सहायक म्हणुन निवड झाली आहे. येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात १२ वी विज्ञान उत्तीर्ण झाल्यानंतर बी ए आणि एमए याच महाविद्यालयात शिकत असताना स्पर्धा परीक्षेची तयारी केली. महाविद्यालय करिअर कट्टा स्पर्धा परीक्षा केंद्र आणि ग्रंथालय अभ्यासिका ची मदत झाली असे गायकवाड हिने म्हंटले आहे.

यावेळी प्राचार्य डॉ संजय अस्वले, उपप्राचार्य प्रा. जी एस मोरे डॉ व्ही डी देवरकर यांची उपस्थिती होती. या यशाबद्दल कु सुप्रिया गायकवाड हिचे भारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष आश्लेष मोरे, सरचिटणीस जनार्दन साठे, सचिव पद्माकर हराळकर, सहसचिव डॉ सुभाष वाघमोडे आदींनी अभिनंदन केले आहे.

## प्रामाणिकपणे प्रयत्न करा यश हमखास मिळेल - राधाताई कडवकर



**कन्नड (अरुण थोरात):** जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिक्षण महर्षी स्व के के जाधव माध्यमिक विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राईडचे ग्रुप ऑफ एज्युकेशनचे सतीश शर्मा व प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार विद्याचरण कडवकर, सामाजिक कार्यकर्त्या राधाताई कडवकर, व उपप्राचार्य संतोष मतसागर यांची उपस्थिती होतीविद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्रीमती कडवकर यांनी सांगितले की आपण प्रामाणिकपणे प्रयत्न करत राहिलो तर एक दिवस यश आपणास हमखास मिळते, यावेळी उपप्राचार्य संतोष मतसागर यांनी दहावीनंतर काय या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सतीश शर्मा यांनी विद्यार्थ्यांना आपल्या अभ्यासात सातत्य ठेवून चांगल्या पद्धतीने पेपर सोडवण्यासाठी शुभेच्छा दिल्या. मागील वर्षाच्या दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा देवेंद्र सिंग राजपूत यांच्या वतीने रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला, तसेच दर्शन रोजेकर ऋतुजा अकोलकर, प्रतीक्षा अकोलकर या विद्यार्थ्यांना आदर्श विद्यार्थी पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले, यावेळी मनोज कंचार, श्रावणी मगर, प्रगती चव्हाण प्राची राठोड या विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शालेय आठवणींना उजाळा दिलाकार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश जंजाळ व आभार सचिन भामरे यांनी मानले, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दीपक जाधव, जगमोहन मुंडवाडकर, ज्ञानेश्वर नायकुडे, लक्ष्मण पांडव, सुनिता दापके, सुभाष जाधव, संतोष आग्रे यांनी अनमोल सहकार्य केले

## आधी मी कवितेला सांभाळले, आता कविता मला सांभाळतेय - अजीम नवाज राही



**कन्नड (अरुण थोरात) :** आज या यशस्वी, प्रसन्न वळणावरून मागे वळून बघतांना सारं, सारं स्वप्नासारखं वाटतं, इयत्ता १० वी ११ ते महाराष्ट्र राज्याच्या ११ विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात कवितांचा समावेश, मानसन्मान,पु रस्कार अगदी शब्दयात्रेची झोळी शिगोशिग भरून ओसंडली, ज्या घरात जन्मलो त्या घराला कसला शिक्षणाचा, पुस्तकाचा वसा,वारसा, मिठभाकरीच्या तजविजीसाठी वडिलोपार्जित ढोरमेहनतीचे सटरफटर व्यवसाय, रोजगार भटकंतीने भरभरून दिलं, माणूसवाचन झालं, जंगलवाचन झालं, रोजगाराच्या सगळ्या शक्यता जेंव्हा मावळल्या तेंव्हा वाणी दिमतीला आली, वक्ता, निवेदक म्हणून सुरू झाली राज्यभराची भटकंती, आधी मी कवितेला सांभाळले, आता कविता मला सांभाळत आहे. भोवतालाने भरभरून दिले, अनुभवाची उसनवारी करण्याचं, कल्पनांच्या भराऱ्या मारण्याचं काम पडलं नाही, सुचलेलं नाही,बोचलेलं कवितेत मांडण्याची वस्तुनिष्ठ सवय लेखणीला जडली असे चिंतनीय प्रतिपादन प्रख्यात मराठी कवी, नामवंत वक्ते, निवेदक अजीम नवाज राही यांनी केले, दि. ११ फेब्रुवारी रोजी कन्नड शहरातल्या स्व पूर्णाकाकु कोल्हे महिला प्रबोधनी सभागृहात स्व फुलसिंग दगडू केवट यांच्या द्वितीय स्मृतीदिनानिमित्त आयोजित, मी आणि माझ्या शब्दप्रवासातली संघर्षशील वळणे या विषयावर आयोजित व्याख्यानात अजीम नवाज राही बोलत होते, व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे होते, प्रमुख अतिथी म्हणून नवोदयचे प्राचार्य पंकज देशमुख, विभागीय शिक्षण मंडळाचे सदस्य सागर जाधव, शिक्षसेनेचे राज्य सरचिटणीस दिपक पवारऍड प्रसन्ना पाटील, प्रा. शिवाजी हुसे,संपतराव केरे, डॉ.रमेश सूर्यवंशी, नगरसेवक रत्नाकर पंडित, संतोष निकम, सुधाकर देवकर, प्रा.अरविंद कांबळे, प्रा.रंगनाथ लहाने, बी एल कुंभकर्ण, ब्राम्हणकर, डॉ.यशवंत पवार, नवले आप्पा, यांची उपस्थिती होती. आपल्या मनोगतात अजीम नवाज राही पुढे म्हणाले की आपण ज्या हवेत जगतो ती हवा निर्मितीत वाहिली पाहिजे, वरचा टरफल भाजल्याशिवाय आतला दाणा चवदार होत नाही, सगळ्या क्षेत्रांमध्ये अमुलाग्र बदल घडले, साहित्यक्षेत्र त्याला अपवाद नाही, वर्तमानातले प्रश्न,वर्तमानातली आव्हाने निर्मितीत प्रतिबिंबित झाली पाहिजे, माणसाने भाषा घडविली, आता माणूस घडवण्याचं काम भाषेवर येऊन ठेपलं आहे, अख्ख्या जगाचं एक ग्लोबल खेडं झालं आहे. पूर्वीच्या अडचणी आता राहिल्या नाहीत, सकारात्मकता असली की सगळं मनासारखं घडतं, संवादीची, प्रसिद्धीची सगळी आयुधे माणसाच्या ताब्यात आली आहेत, तिचा विनियोग कसा करायचा हे माणसावर अवलंबून आहे, महानगरीय वचक, महानगरीय प्राबल्य आता संपुष्टात आले,ग्रामीण परिसरात खरी प्रतिभा अंगोपांगी फुलत आहे, डेरेदार होत आहे, यशाची, किर्तीची, प्रसिद्धीची क्षितिजे कवेत घेत आहेत, न्यूनगंड मनातून खरवडून टाकण्याचा, भरारी घेण्याचा काळ आहे, नकारात्मकता सुवर्णसंधीचं सोनं होऊ देत नाही याचे डोळस भान असले की प्रवास सुकर होतो हे मनावर बिंबवलं पाहिजे,आपल्याबिकट, खडतर, संघर्षशील जडणघडणीच्या प्रवासाच्या रेशीमगाठी उलगडतांना अनेक विनोदी किस्से सांगून अजीम नवाज राही यांनी श्रोत्यांना खळखळून हसवलं, साध्यासोप्या भाषेतल्या त्यांच्या मनोगताने वाक्यागणिक टाळ्या एकवटल्या, तब्बल अडीच तास ओघवत्या, रसाळ, मधाळ शैलीच्या माध्यमातून अजीम नवाज राही यांनी व्याख्यानावर घेतलेली पकड समारोपीय वळणापर्यंत कायम राहिली, श्रवणसौख्याच्या रिमझिमीत श्रोत्यांना चिंब भिजवत राहिली. यावेळी कालिदास उपासनी, संजय जाधव, धैर्यशील केरे, अनिल कोल्हे, सचिन आहेर, नितीन पाटील, सचिन पुरी, राकेश निकम यांसह शिक्षक, पत्रकार, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालनसंजय जाधव ,सचिन आहेर आणि यांनी केले.


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईन्डींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट
साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १४ फेब्रुवारी २०२५


## राज्यातील शिक्षकांच्या प्रश्नांवर शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्याशी सकारात्मक चर्चा



**कन्नड (अरुण थोरात) :** राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या प्रश्नांबाबत शिक्षक नेते काळूजी बोरसे पाटील यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील शिक्षक संघटना समन्वय समितीच्या पदाधिकाऱ्यांनी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची भेट घेऊन सकारात्मक चर्चा केली. यावेळी अशैक्षणिक कामे कमी करून कागद कामापेक्षा शिक्षकांना फक्त अध्यापन करू द्यावे. याबाबत लवकरच बदल दिसून येईल असे साहेबांनी सांगितले. जिल्ह्यातील आदर्श शिक्षक पुरस्कार वेतनवाढीचा फरकाबाबत साकडे घालण्यात आले. यावर ग्रामविकास विभागाशी पत्र व्यवहार करून विषय मार्गी लावण्याबाबत अस्वस्थ केले. जिल्ह्यातील संगणक परिक्षेतील निवृत्त शिक्षकांची वसूली परत करण्याबाबत. यावर इतर जिल्ह्यांच्या प्रमाणे कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. शिक्षकांबद्दल सकारात्मक भूमिका व उपक्रमशील शिक्षक यांच्या कामासह जाणून घेऊन गुणात्मक बदलांकडे जाऊया यावरही चर्चा झाली.राज्यासह जिल्ह्यातील पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख व विस्तार अधिकारी या पदांची पदोन्नती करून अभावित पद्धतीने केंद्र प्रमुख भरण्याबाबत चर्चा झाली.

यावेळी या शिष्टमंडळात शिक्षक संघाचे नेते धनराज वाणी, केंद्र प्रमुख संघटनेचे दादाजी काकळीज, शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष संजय शेवाळे, शिक्षक भारतीचे राजेंद्र दिघे, शिक्षक समितीचे भाऊसाहेब पवार, शिक्षक सेनेचे अनिल जगताप, अशोक बडोगे, मोठाभाऊ देवरे आदी उपस्थिती होती अशी माहिती शिक्षक समितीचे मराठवाडा विभागीय प्रसिध्दीप्रमुख सतीश कोळी यांनी दिली.

## खान्देश मंचच्या वतीने साहित्यिक डॉ. रमेश सुर्यवंशी यांचा सत्कार




**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड छत्रपती संभाजीनगर येथील जेष्ठ साहित्यिक डॉ. रमेश सुर्यवंशी यांची महाराष्ट्र शासन भाषा विभाग यांच्या कडून दिला जाणारा आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जेष्ठ भाषावैज्ञानिक आणि साहित्यसमीक्षक डॉ. अशोक केळकर याचा नावाचा देण्यात येणारा " अशोक केळकर मराठी भाषा अभ्यासक पुरस्कार २०२४" साठी डॉ. रमेश सुर्यवंशी यांना दि. २७ फ्रेबुवारी २०२५ रोजी मुंबई येथे दोन लाख रुपये रोख व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात येणार आहे त्या निमीत्तने जनाधूनं (खान्देश) विचार मंच छत्रपती संभाजीनगर व अहिरानी कस्तुरी मंच यांच्या प्रतिनिधी कडून त्याचा शाल, पुष्पहार,व जनाधुनं (खान्देश) विचार मंच छ.संभाजीनगर या सृस्मीचिन्ह देऊन संत्कार करण्यात आला.

यावेळी जनाधूनं चे संस्थापक अध्यक्ष विनायक पवार,डॉ जितेंद्र देसले, कैलास पाटील, ह.भ प.रत्नाकर कोठावदे, रविंद्र देवरे, प्रा.धामने, अनिल अहिरे, रावसाहेब सोनवणे, डॉ. सदाशिव पाटील व अन्य खान्देशी बंधू उपस्थित होते. यावेळी संत्कार मुर्ती डॉ. रमेश सुर्यवंशी सरानी उपस्थित खान्देशी बंधूना त्यांनी लिहलेले अहिराणी बोली सुलभ व्याकरण, खानदेशातील म्हणी (वर्गीकरणात्मक) शरणागत प्रपत्ती, अजिठा डोंगरातील किल्ले, अजिठ्याचे डोंगर-पर्यटन अहिराणी शब्दकोष अशी अनेक पुस्तके सरानी भेट दिल्या

## बनशेंद्रा गावात बिबट्याचीं दहशत, शेतकरी मात्र भयभीत



**कन्न्ड (राहुल थेटे) :** वन विभाग मात्र कुंभकर्णी झोपेत, एकच शेतकऱ्याचे दोन म्हशीच्या वगारुंचा पाडला फडशा...... कन्नड तालुक्यातील बनसंद्रा गावात बिबट्याने दहशत माजविली असून आत्तापर्यंत एकच शेतकऱ्याच्या दोन म्हशीच्या वाघांचा पडश्या बिबट्याने पाडला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की गेल्या एक महिन्यापासून बनशेंद्रा गावामध्ये बिबट्याचा संचार वाढला असून शेतवस्तीवर राहणाऱ्या (गट नंबर - ९६)गोरख लक्ष्मण चोपडे यांच्या एका म्हशीच्या वगरुचा फडशा पाडला होता तर त्यानंतर पुन्हा त्याचा ठिकाणी दुसऱ्या वगारुला त्या बिबट्याने ८ दिवसापूर्वी जखमी केले हिते त्या जखमी वगारूचा आज बुधवारी उचरदरम्यान मृत्यू झाला मात्र संसध्याकाळी पुन्हा त्याच बिबट्याने शेतकऱ्याला दर्शन दिले असून गावातील अनेक शेतकरी व गावकरी यांनाही या बिबट्याने त्रस्त केले आहे सध्या गहू हरभरा कांदे मक्का या पिकांना पाणी द्यायचे काम चालू असल्याने शेतकरी मात्र पाणी द्यायला सरसावत नाही त्यामुळे बिबट्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांची पिके ही पाण्या वाचून करपून जात आहेत मात्र वनविभाग सध्या कुंभकर्णी झोपेत असून शेतकऱ्यांचा जीव वं पिके मात्र टांगणीला लागले आहे त्यामुळे या बिबट्याचा बंदोबस्त वन विभागाने करावा नसता वन विभागाच्या अधिकाऱ्यांना काळे फासण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.चौकट :- शेतकऱ्यांच्या मृत प्राण्यांना वन विभागाकडून मिळणारी मदत तुटपुंजी..... बिबट्याने जर शेतकऱ्याच्या एखाद्या पाळीव प्राण्यांवर हल्ला केला वं बिबट्यच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा पाळीव प्राणी मृत पावला तर शेतकऱ्यांना वन विभागाकडून अथवा शासनाकडून जी आर्थिक मदत शेतकऱ्याला दिली जाते ती अतिशय तुटपुंजी असते व त्या मदतीसाठी शेतकऱ्याला ऑनलाइन तक्रार करून वनविभागाकडे हेलपाटे मारावे लागतात तरीही उदासीन असलेले शासन व उदासीन असलेला वनविभाग शेतकऱ्याला आर्थिक मदत देत नाही ही एक शोकांतिका आहे.प्रतिक्रिया :- गोरख चोपडे :- गेल्या वर्षभरात बिबट्याच्या हल्ल्यात माझ्या म्हशीच्या व गाईच्या अनेक वासरांचा बिबट्याने फडशा पाडला आहे याबाबत वनविभागाला मी वारंवार तोंडी व लेखी तक्रारी केल्या आहे मात्र आश्वासनाच्या पलीकडे वनविभागाकडून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणी पुसली जातात अनुदान नको पण बिबट्या आवर अशी परिस्थिती सध्या बिबट्यामुळे शेतकऱ्यांची झाली आहे मात्र वनविभाग कुंभकर्णी झोपेत असून बिबट्याच्या हल्ल्यात शेतकऱ्यांची जनावरे मरत असताना या बिबट्याला पकडण्यासाठी वन विभागाकडून कुठलीही तातडीची उपाययोजना केली जात नसून एखाद्या मानवी जीवाचा बळी गेल्यानंतर वनविभाग कुंभकर्णी झोपेतून जागे होणार का असा प्रश्नही शेतकऱ्यातून विचारला जात आहे.

## श्री संत जनार्दन स्वामी गुरूकुल वेरूळची माजी विद्यार्थ्यीनी दिपाली हिवर्डे ची सहाय्यक महसूल अधिकारी पदावर निवड



**वेरुळ : (प्रा. योगेश रावते)** येथील श्री संत जनार्दन स्वामी विद्यालय वेरूळ येथे शिक्षण घेतलेल्या कु. दीपाली धोंडीराम हिवर्डे हिने नुकत्याच जाहीर झालेल्या एमपीएससीच्या परीक्षेत यश मिळवले.अतिशय गरीब शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या दीपालीने आपल्या जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर एमपीएससी परीक्षेत घवघवीत यश मिळविले. गुणवत्ता यादीतून सहाय्यक महसूल अधिकारी म्हणून तिची निवड करण्यात आली. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जगद्गुरू श्री.श्री. १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरी महाराज तसेच संस्थेचे सचिव महंत १०८ श्री सेवागिरीजी महाराज, प्रशासकीय अधिकारी श्री गोरे साहेब, गुरुकुल विकास समितीचे श्री अंकुशजी जाधव यांनी अभिनंदन केले.

तसेच जय बाबाजी भक्त परिवाराचे प्रवक्ते श्री राजेंद्रजी पवार, श्री गणपत मस्के, श्री मनोहर गावडे, श्री गोपाल नवले, श्री उगले साहेब व विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री अधाने गुरुजी यांच्यातर्फे कु.दिपालीचा सत्कार करण्यात आला. दिपाली ने मिळवलेल्या यशाबद्दल वेरुळ गुरुकुलातील प्राचार्य श्री.व्ही.यु.बोरसे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून दिपालीचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.